# मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे कक्ष
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओस्तवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट :-१०८/२०२२ दिनांक – १८/०४/२०२२

# Fake Digital Payment अॅपद्वारे होणा-या फसवणुकीबाबत घ्यावयाची काळजी......

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात ऑनलाईन पेमेंटसाठी अनेक अॅप उपलब्ध असून नागरीक त्यांचा सर्रासपणे करत आहेत. दैनदिंन वापरातील बहुसंख्य दुकानदार व्यवसायिक व्यापारी तसेच फेरीवाले फुटपाथवर फळ भाज्या विक्री करणारे यांचेकडे डिजिटल पेमेंट घेण्याची सोय आहे. नागरीकही अशा सुविधांचा दैनंदीन वापर करीत आहेत. या पेमेंट करीता वेगवेगळया कंपन्यांचे अॅप्स असून ते सुरक्षित मानले जाते. परंतु पेटीएम स्पुफ सारखे काही अॅप उपलब्ध झाल्याने अनेक नागरीक तसेच व्यापाऱ्यांची फसवणुक होत असल्याने निदर्शनास येत आहे व त्याबाबतच्या तक्रारी सायबर गुन्हे कक्षाकडे प्राप्त होत आहे. सदर फेक अॅप हे मुख्य प्रवाहातील अॅप सारखे कॉपी केलेले असल्याने हा फसवणुकीचा प्रकार लवकर लक्षात येत नाही.

**फसवणुकीचा प्रकार :-**

- **फसवणुक करणारी व्यक्ती ही प्रथम दुकानात खरेदी करते.**
- **त्यानंतर डिजिटल पेमेंट करताना पेटीएम स्पुफ सारखे अॅप वापरुन बनावट पेमेंट सुचना तयार करते.**
- **यासाठी ग्राहक बनून आलेली व्यक्ती दुकानाचे नाव, दुकानाचा फोन क्रमांक त्यात फिड करते .**
- **दुकानदाराला बनावट पेमेंट झाल्याची पावती दाखवते. जी हुबेहूब ख-या डिजिटल पेमेंट अॅपसारखी दिसते.**
- **एवढेच नव्हे तर पेटीएम स्पुफ दुकानदाराच्या मोबाईलवर पाठविते. परंतु हे पैसे प्रत्यक्षात बँक खात्यात जमा होत नाही.**

**याकरीता उपाय :-**

→ **कोणाकडूनही पैसे घेतल्यानंतर वा व्यवहार केल्यानंतर आपल्या बँक खात्यातील रक्कम तपासून पहावी.**

→ **आपल्या बँक खात्यावर पैसे कोठून जमा करण्यात आले आहे ते स्त्रोत पडताळून पाहणे गरजेचे आहे.**

→ **खात्यात पैसे जमा झाल्याची सूचना अथवा मेसेज प्राप्त झाले आहे का ? याची खात्री करुन घ्यावी.**

→ **तसेच ग्राहक खरेदी करीत असताना त्याने केलेल्या पेमेंटचा तपशील त्याचे नाव व इतर माहीती आपल्या अभिलेखी नोंद करुन ठेवावी.**

→ **पेमेंट झाल्यानंतर नोटीफीकेशन अनाऊसंमेंट डिव्हाईसचा वापर करावा.**

→ **पेमेंट झाल्याची अथवा नोटीफीकेशनची खात्री करुनच ग्राहकांना खरेदी माल घेवून जाण्यास सांगावे.**

**तरी मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

-----oooo----